# नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघाचा विविध सामाजिक उपक्रमांवर भर

## डिजे मुक्त व गुलाल मुक्त गणेशोत्सव साजरा करणार - संस्थापक अध्यक्ष बबन डिडोरे



श्रीगणेशा आरोग्याचा या अंतर्गत महासंघातर्फे रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देताना संस्थापक अध्यक्ष बबन डिडोरे पाटील.



नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघातर्फे माजी अर्थ राज्यमंत्री खासदार डॉ.भागवत कराड यांचा गणरायाची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला.

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघातर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे तसेच शासनाच्या श्री गणेशा आरोग्याचा याअंतर्गत विविध आरोग्य तपासण्या, उपचार शिबिर, रक्तदान शिबिराचे आयोजन नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघातर्फे या वर्षी गणेशोत्सव राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. महासंघाचे २२ वर्ष असल्याचेही संस्थापक अध्यक्ष बबन डिडोरे पाटील व अध्यक्ष अशोक दामले यांनी सांगितले.

श्री गजानन महाराज मंदिर चौक छत्रपती संभाजीनगर येथे श्री गणेशाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच सर्वात महत्त्वाचे यावर्षीचा गणेशोत्सव डीजे मुक्त गुलाल मुक्त प्रदूषण मुक्त तसेच शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या शासकीय आरोग्य योजनांचा नागरिकांना कसा फायदा होईल याबाबत जनजागृती करत देखील हा गणेशोत्सव साजरा करण्याचा आमचा मानस असल्याचे नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष बबन डिडोरे यांनी सांगितले.

३१ ऑगस्ट रोजी सर्वात श्रेष्ठ दान म्हणजे रक्तदान अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजासाठी एक वेगळा आदर्श निर्माण केला. गरजू रुग्णांना गरज पडल्यास आमच्याशी संपर्क साधावा आणि तात्काळ त्यांना रक्त कसे उपलब्ध होईल तसे रक्त मिळण्यास काही अडचणी आल्यास त्या सोडवू असेही संस्थापक अध्यक्ष बबन व अध्यक्ष अशोक दामले यांनी सांगितले.

नवीन छत्रपती संभाजीनगर श्री गणेश महासंघ येथे श्री गणरायाची आरती माजी अर्थ राज्यमंत्री खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्या हस्ते भक्तिभावाने संपन्न झाली. व्यापारी वर्गाच्या एकतेचे व सांस्कृतिक वारशाचे प्रतीक असलेला हा महासंघ गणेशोत्सवात भव्यतेसोबतच सामाजिक बांधिलकीही जपत आहे. गणरायाच्या कृपाशिर्वादाने सर्व भक्तांना भरभराट लाभो, समाजात आनंद, ऐक्य आणि समृद्धी नांदो, हीच प्रार्थना. सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व गणेशभक्तांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा देखील माजी अर्थ राज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड यांनी दिल्या.

# 'क्षमाच वीराचं धर्म आहे' - उपाध्यक्ष श्री विरंजन सागर जी महाराज



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

देशमुख नगर येथील श्री १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिराच्या देशना मंडपात पार पडलेल्या धर्मसभेमध्ये उपाध्यक्ष श्री विरंजन सागर जी महाराज यांनी संबोधित करताना सांगितले की, 'क्षमाच वीरांचं धर्म आहे.' पर्यूषण पर्वाच्या निमित्ताने १० लक्षण धर्मावर आधारित या कार्यक्रमात हजारो भक्तांनी प्रभूंचा अभिषेक केला आणि संगीतमय पूजनात सहभागी झाले.

मुनिश्रींनी सांगितले, 'क्षमाच वीरांचा धर्म आहे. क्षमा प्रत्येक व्यक्तीला सहज साध्य होत नाही. त्यासाठी अंतःकरणातून साहस लागतं. क्षमा हा प्रत्येकाचाच धर्म आहे. जसं पाणी कितीही तापवलं तरी शेवटी ते थंड होतं, शीतल होतं, तसंच मानवाच्या अंतर्मनात क्षमाधर्म असतो. क्रोध हा धर्म नाही. क्रोध माणसाला जाळून टाकतो. क्रोधामुळे कित्येक कुटुंबं उद्ध्वस्त झाली आहेत, नष्ट झाली आहेत.'

मुनिश्री पुढे म्हणाले, 'क्षमेला स्वीकारण्यापूर्वी आपण पाहिलं पाहिजे की क्रोध कोणत्या कर्मांमुळे येतो. आजच्या काळात क्रोध माणसाच्या स्वभावाचा एक भाग झालेला आहे. क्रोध कसा जिंकायचा, हे समजून घेणं गरजेचं आहे. क्रोध आपल्याला तेव्हा येतो, जेव्हा आपली इच्छा पूर्ण होत नाही. क्रोध हे एक प्रकारचं वेड आहे. क्रोध आला की माणूस शुद्धी-बुद्धी हरपतो. अशा क्रोधी व्यक्तीकडून मग तो आपल्या आई-वडिलांवर, कुटुंबावर, समाजावर वाईट विचार करू लागतो.'

'क्रोध आपलं जीवन नष्ट करतो. क्रोधावर विजय मिळवण्यासाठी आपल्याला जे मिळालं आहे ते पुरेसं आहे असं मानायला हवं. आपल्याला आपल्या इच्छांचं सीमितीकरण करणं आवश्यक आहे. क्रोध संपूर्ण विनाशाचं कारण बनतो. क्षमा मोठ्यांनी करावी, मृत व्यक्तींविषयीही क्षमाभाव ठेवावा.

मुनिश्रींनी सांगितलं की, 'चूक प्रत्येकाकडून होते, पण जी व्यक्ती दुसऱ्याची चूक क्षमा करते, तीच खरोखर मोठी असते. क्षमा तीन प्रकारच्या परिस्थितींमध्ये केली जाते. क्षमा ही हृदयातून केली जाते. क्षमेमुळेच व्यक्ती उंचीवर पोहोचतो. क्षमेमुळे शत्रूही मित्र बनतो. क्षमतेचा अधिकार केवळ मानवाला आहे, पशूंना नाही. क्षमावान व्यक्ती विवेकसम्पन्न असतो, तर क्रोधी माणूस विवेक हरवतो.'

# दधिच विप्र मंडळातर्फे भाद्रपद अष्टमीनिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथे दधिच विप्र मंडळातर्फे भाद्रपद अष्टमीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंगल पाठ, भक्ती गीते, ददिमातेचे सुंदर अशी गीते येथे सादर करण्यात आली. दधिच विप्र मंडळातर्फे वर्षभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच समाजातून दानशूर व्यक्ती पुढे येवून कार्यास हातभार लावतात. त्यामुळे कार्य सुरळीत होते. तसेच महिलांसाठी विविध कार्यक्रम घेण्यात येत असल्याचे आयोजकांमार्फत सांगण्यात आले.



दधीचि ऋषी हे एक प्रसिद्ध वैदिक ऋषी होते, जे पुराणांमधील आपल्या प्रचंड त्यागासाठी ओळखले जातात, विशेषतः त्यांनी इंद्र देवासाठी वज्र बनवण्यासाठी स्वतःच्या हाडांचे दान केले. ते महर्षी अथर्वण आणि चित्ती यांचे पुत्र होते, आणि त्यांच्यापासूनच अथर्ववेदाची निर्मिती झाली असे मानले जाते.

दधीचि हे अथर्वण ऋषी आणि चित्ती यांचे पुत्र होते, असे मानले जाते की त्यांनीच अथर्ववेदाची निर्मिती केली. पौराणिक कथेनुसार, देवराज इंद्र यांना वृत्रासुर नावाच्या राक्षसाचा पराभव करण्यासाठी दधीचि ऋषींनी आपले हाड दान केले, ज्यामुळे इंद्राला वज्र बनवता आले.

दधीचि ऋषींचे हे कार्य समाजाला अंगदान आणि निस्वार्थ सेवेची प्रेरणा देते.

त्यांची पत्नी गभस्तिनी होती आणि त्यांचा पुत्र पिप्पलाद होता, जो अथर्ववेदाच्या पैप्पलाद शाखेचा द्रष्टा मानला जातो. काही पौराणिक कथांनुसार, त्यांना कर्दम ऋषी आणि देवहूति यांची कन्या सुकन्या यांचे पुत्र मानले जाते, तर काही ठिकाणी त्यांना च्यवन ऋषींचा पुत्र देखील म्हटले आहे.

# सर्व जाती-धर्मात बंधुभाव निर्माण करणारे शाहू महाराजांचे धोरण होते - ॲड. डॉ. पी. एस. चंगोले



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे धोरण हे सर्व जाती-धर्मात बंधुभाव निर्माण करणारे होते, असे प्रतिपादन सत्यशोधक प्रबोधनकार ॲड. डॉ. पी. एस. चंगोले यांनी केले.

गुरु रविदास सत्यशोधक समाजातर्फे रविवार, दि. २४ ऑगस्ट रोजी मौलाना अबुल कलाम आजाद संशोधन केंद्राच्या सभागृहात समाजातील गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांच्या गुणगौरव सोहळ्याचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. चंगोले बोलत होते.

आपल्या सव्वा तासांच्या प्रभावी भाषणात त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांची हृदयस्पर्शी मांडणी केली. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थितांचे डोळे पाणावले, तर 'चर्मकार समाज हा फाटलेले जोडणारा इंजिनियर आहे' या विधानावर टाळ्यांचा गजर झाला.

सोहळ्याचे उद्घाटन दैनिक लोकमतचे ज्येष्ठ पत्रकार स सो खंडाळकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. प्रारंभी गुरु रविदास सत्यशोधक समाजाचा सोनेरी ध्वज डॉ. पी. एस. चंगोले यांच्या हस्ते फडकावण्यात आला. यावेळी सत्यशोधक स्वयंसेवक दलाने मानवंदना दिली. मानवतावाद व विज्ञानवादाचे प्रबल समर्थक यांच्या प्रतिमांना पाहुण्यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बालाजी सोनटक्के, गामा पिंजरकर, डॉ. शिवाजीराव धनवाले, मीराताई घोपे, डॉ. काशिनाथराव चौधरी, लता ताई बावस्कर, शोभाताई लोखंडे व सुनिता डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

गुणगौरव सोहळ्यात दहावीचे ३३, बारावीचे १५ तसेच पदवी-पदव्युत्तरचे ३० विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तर १३ सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक चळवळीचे प्रदेश सचिव सी. एम. रमणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय जी. के. काटकर यांनी करून दिला.

सूत्रसंचालन जिल्हा संयोजक संतोष राव लोखंडे यांनी केले तर प्रा. भगवान बावस्कर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बी. सी. वाडेकर, बी. जी. तुपे, अशोक वाढई, अशोक डांगे, डी. वाय. ठोंबरे, रमेश डोंगरे, एच. आर. काठोटे, बृजलाल बन्सवाल, चंद्रकांत कांबळे, पद्माकर शकोकार,प्रविण बोर्डे वासुदेव घोपे, शंकरराव बावस्कर, एच. वाय. गतखने, गोपाल बिरसोने, उषाताई वाढई, प्रभु कटारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199